# बाबा मुक्तानंदांच्या समयातीत शिकवणी

"प्रत्येक व्यक्तीच्या हृदयात शांतीचा महासागर आहे."

~ बाबा मुक्तानंद

ऑस्कर फिगरोआ यांच्याद्वारे लिखित भाष्य

महासागर हा केवळ चित्ताकर्षकच नसतो, तर त्यात जणू एक संमोहक शक्ती असते—प्रचंड व गर्जना करणारी ती अथांग जलराशी जिवंतपणाने परिपूर्ण असते आणि त्यामधून लाटा निरंतर उदयास येत असतात व विलीन होत असतात. निसर्गाचा हा चमत्कार पाहून प्रत्येकाच्या मनात आदराची आणि प्रशंसेची भावना आल्यावाचून राहत नाही. तरीदेखील, कदाचित खरे आश्चर्य तर अविरत उसळणाऱ्या आणि विलीन होणाऱ्या त्या प्रचंड लाटांच्या तळाशीच असते : महासागरात अगदी खोलवर वसलेली परम शांती. उपनिषदांमध्ये[१] आढळून येणारी ही उत्कृष्ट उपमा देऊन आणि आपल्यापैकी प्रत्येकाशी तिचा संबंध जोडून, बाबा मुक्तानंद आपल्याला स्मरण करवून देतात की, ज्या गोष्टींचा गुणधर्मच मुळात चढ-उतार आणि अशाश्वतता आहे, त्यांच्या गाभ्यामध्ये आपल्याला सदैव निःस्तब्धता गवसू शकते. अविचल, सखोल असा आत्मारूपी महासागर आपल्याला नेहमीच प्राप्त होऊ शकतो. बाबांची ही शिकवण आपल्याला सांसारिक जीवनातील अनिश्चिततांच्या तसेच आपल्या बहिर्मुखी व्यक्तिमत्त्वाशी निगडित अनेकानेक स्तरांच्या पलीकडे जाण्यास मार्गदर्शन करते, जेणेकरून आपण परम विश्रांतीची ती अवस्था प्राप्त करू शकू, जी आपले सत्य स्वरूप आहे. सिद्धयोग अभ्यासांच्या कोमल आणि शक्तिपूरित पाठबळासह, बाबांची वचने आपल्याला त्या शांतीमध्ये अवस्थित होण्याच्या दिशेला घेऊन जाऊ शकतात, जी आपले स्वाभाविक निवासस्थान आहे.

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

[१] पाहा, उदाहरणार्थ, छान्दोग्योपनिषद् ६.१०.